*IOSR Journal Of Humanities And Social Science (IOSR-JHSS)*
*Volume 30, Issue 2, Series 1 (February, 2025) 39-44*
*e-ISSN: 2279-0837, p-ISSN: 2279-0845.*
*www.iosrjournals.org*

# वैदर्भीय लेखिकांच्या कथांमधील कौटुंबिक जाणिवांचे स्वरूप : प्रा. उन्नती संजय चौधरी

प्रा. उन्नती संजय चौधरी
*खिरोदा,ता. रावेर, जि. जळगाव*
*पिन-४२५५०४*

Date of Submission: 25-01-2025 Date of Acceptance: 05-02-2025

## I. प्रस्तावना

कुटुंबसंस्था ही सामाजिक धारणा करणारी प्रमुख संस्था असून समाजपरत्वे तिची लक्षणे वेगवेगळी असतात. भारतीय समाजरचना विविध जातीसमूहामध्ये विभागली गेल्याने त्या त्या समाजसमूहातील किंवा जातीसमूहातील कुटुंबाचे सांस्कृतिक लक्षणे काहीसे भिन्न असतात. तरीही विवाह, जन्म व दत्तक घेणे यामुळे आबालवृद्ध स्त्री-पुरुषांचे नातेसंबंध निर्माण होतात. रक्तसंबंधातून निर्माण झालेल्या नात्यातील माणसे एक कुटुंब म्हणून एकत्र राहतात. त्यामध्ये आई-वडील पती-पत्नी आणि मुलगा व मुलगी हे कुटुंबाचे प्राथमिक घटक असतात. त्यांचे मिळून तयार झालेले कुटुंब हे प्राथमिक कुटुंब असते. त्यांच्याशी संबंधित दुरच्या नात्यातील व्यक्ती एकत्र राहतात, तेव्हा ते संयुक्त कुटुंब असते. भारतीय कुटुंबसंस्था ही पुरुषप्रधान म्हणजेच पितृसत्ताक आहे. पुरुष हा कुटुंबकर्ता म्हणून प्रमुख मानला जातो. सामाजिक, धार्मिक, आर्थिक व संस्कृती यांसारखे व्यवहारही त्याच्या मर्जीनुसार चालतात. कुटुंबावर त्याचा प्रभाव असतो. त्याच्या परवानगीशिवाय किंवा मर्जीशिवाय कुटुंब सदस्यांना बऱ्याचदा निर्णय घेता येणे शक्य नसते. या पार्श्वभूमीवर विदर्भातील लेखिकांच्या कथांमध्ये कौटुंबिक जीवनाचे अनुभवविश्व कसे रेखांकित झालेले आहे, याचे विश्लेषण या ठिकाणी करता येण्यासारखे आहे.

**सुप्रिया अय्यर** यांच्या 'चांदणचुरा' संग्रहातील 'काळीज' कथेतील गरोदर तरूण विवाहितेला डोळ्याने दिसत नाही, म्हणून तिचे कुटुंब तिला तिच्या माहेरी टाकून देते. तिची म्हातारी आई तिला दवाखान्यात घेऊन जाते. त्या म्हातारीचे हाल होत असल्याने तिला सगळ्या कुटुंब सदस्यांचा राग येतो. पण लेकीच्या काळजीने ती धावपळ करते. विवाहितेला तिच्या सासरच्या कुटुंबाकडून उपेक्षा तर येतेच,पण तिच्या माहेरकडील कुटुंबातील भाऊ व वाहिनीदेखील तिच्याकडे दुर्लक्ष करतात.

'मोला छोड दे अम्मा' या कथेतील कुटुंबप्रमुखाच्या वाईट वागण्यामुळे कुटुंबाची वाताहत होते. दोन मुली,मुलगा व पतीपत्नी असे हे कुटुंब एका वस्तीत राहते. पुरूषसत्ताक कुटुंबपद्धतीत पुरूषाची मनमानी कुटुंबात चालते. सामान्य कनिष्ठ वर्गातील कुटुंबकर्ता पुरूष हा व्यसनी व बेकार असल्यास स्री हीच कुटुंबाचा चरितार्थ चालविते. मात्र कुटुंबाची जबाबदारी व मुलांचे संगोपन,संस्कार अशा कुटुंबातून होताना दिसून येत नाही. 'किनखापी मोर'या कथेत नवऱ्याची ओळख होण्यापूर्वीच रमाला वैधव्य येते. ती खूप कष्ट करते व कुटुंबाच्या दयेवर जगते. तिचे मन व भावना तिला माराव्या लागतात. हौसमौज सारंच नवऱ्यावाचून राहून जातं. अर्थात कुटुंब हे सासरचे असो की माहेरचे विधवेबाबत त्यांच्या ठिकाणी आस्था,आपुलकी व प्रेम असल्याचे दिसून येत नाही. कुटुंबात कोणी ना कोणी सोबत असलं की गृहिणीला एकाकीपणाची भीता वाटत नाही किंवा एकटेपणाने ती अस्वस्थ होत नाही, याचे चित्रण 'अश्वमेध' कथेत केले आहे. या कथेतील जयरामन बढती होऊन दूरच्या गावी नोकरी करतो. शनिवार, रविवार घरी येणं शक्य होत नाही. त्याची मुलगी लग्न होऊन सासरी जाते. मुलगाही त्याच्या संसारात रमतो. त्याची बायको एकटीच घरी राहते. तिला डिप्रेशनचे अटॅक येतात. त्याची बदलीही होत नाही. ती डिप्रेशनमुळे आत्महत्या करते.

'हरवल्या दिशा' कथेतील नंदिनीचं लग्न होतं. घरात सासू-सासरे, दीर, नणंद असे सदस्य असतात.तिची सासू हेकेखोरपणाने वागते. नवऱ्याचा आळशीपणा तिला आवडत नाही. सासऱ्याचे मेडिकल दुकान नवऱ्याने सांभाळून घ्यावे , म्हणून ती त्याला सांगते, सूचवते तर तिची सासू तिलाच रागवते. म्हणजेच तरुण विवाहित स्त्रीला कुटुंबात, स्वतःच्या मनाने, निर्णयाने काही करताच येत नाही.

**माधुरी अशिरगडे** यांच्या 'आई शपथ' संग्रहातील 'गुंता' कथेतून कौटुंबिक जबाबदारीमुळे स्वतःचे जगणे विसरलेल्या विधवेचे व तिच्या सासूचे भावविश्व प्रकट होते. सुनेने दुसरं लग्न केल्यानंतर आपण एकटे पडू, या विचाराने तिच्या सासूचा मानसिक तोल जातो. ती आक्रमक बनते, परंतु तिचे लग्न मान्य नसलं तरी सासू तिला त्रास देत नाही. सून आणि नात हेच आपल्या भविष्याचा आधार आहे, याची जाणिव तिला असते. पुनर्विवाह करीत नाही 'मन वढायं वढाय' या कथेतील अपरा ही एका सरकारी शाळेत सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकाची मुलगी असून तिला जर्न्यालिझमचा कोर्स करायचा असतो. अंगी असलेले गुण दाखवायचे असतात, परंतु कुटुंबसदस्य तिला समजून घेत नाही. ती बी.एस्सी. झाल्यानंतर घाईघाईत तिचे लग्न उरकून

टाकतात. चार सख्खी भावंड, एक मोठा सावत्र भाऊ व बहीण असलेल्या एका मानव नावाच्या विधी महाविद्यालयाच्या प्राचार्याशी तिचे लग्न केले जाते. मानव कर्तव्यभावनेने बहिण भावंडाचे शिक्षण व लग्नही करू देतो.नंतर कुटुंबाची जबाबदारी पेलणाऱ्या मानवचे निधन होते. त्यामुळे तिच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा ती दोन मुलाचा बाप असलेल्या विधूराशी लग्न करण्यास तयार होते, अशी कौटुंबिक पार्श्वभूमी या कथेतून साकार झालेली आहे.

'वारिणी' कथेतील वारिणीला पतीच्या अपौरूषत्वामुळे मुलबाळ होत नाही. म्हणून ती चिडचिड करते.तिच्यामुळे कौटुंबिक ताणतणाव निर्माण होतात. ती सासूलाच दोषी मानून तिला त्रास देते आणि स्वतःच्या वांझपणाला कारणीभूत ठरवते.साधारणतः सासू सुनेचा छळ करते,अशी समाजाची धारणा बनलेली आहे. मात्र या कथेतील नायिका मातृत्वाच्या ओढीने कर्कश स्वभावाची बनलेली आहे. तिच्या नवऱ्यामध्ये दोष असल्याने तो व त्याची आई तिच्यापुढे हतबल होतात.कौटुंबिक ताणतणाव वाढत जातात,असे चित्रण या कथेत येते.

'पराभूत' कथेतील शालिन सुमिरनकडे सतार वादनाचा क्लास लावते. तो तिला घरी येऊन शिकवायला लागतो. तिला तिचा नवरा अप्पासाहेबांकडूनही काही आडकाठी नसते. परगावी शिकायला गेलेला तिचा मुलगा मोहक दिवाळीला घरी येतो. तेव्हा आईच हे अलिप्तपण, दुरावलेपण त्याला अस्वस्थ करते. आईविषयीचा स्वामीत्वदर्शक भाव त्याच्याठिकाणी आग्रही बनतो. एकीकडे मुलाची नाराजी आणि दुसरीकडे समजनू न घेणारा अलिप्त असणारा पती याने शालिनचा मानसिक तोल ढासळतो. ती मनाने विस्कळीत होते. तिची ही अवस्था पाहिल्यानंतर मोहक तिच्याशी बोलतो. पुर्वीची ओळख देण्याचा प्रयत्न करतो. पण ती एकदम निर्विकार असते. अशाप्रकारे कुटुंबामध्ये एकमेकांवर हक्काची भावना असते,पण त्यांच्यात सुसंवाद नसेल तर कुटुंब विस्कटून जाते, असे यातून स्पष्ट होते.

'अनुनय स्व चा' या कथेतील इंद्रायणी लग्न होऊन सासरी येते तर तिच्या थोरल्या जाऊकडून तिला तुसडेपणाची वागणूक मिळाल्याने तिचा अवमान होतो. लग्नानंतर पाचव्या दिवशीच्या मांडव परतणीनंतर ती माहेरी येते. त्या पाच दिवसात सासू, नणंद आणि मोठी जाऊ यांच्याकडून तिला आपुलकीचा अनुभव आलेला नसतांना ती सारे ठीक असल्याचे खोटे बोलते. स्वतःची स्तुती करत राहते, याची सवय तिला होते. तिच्या कुटुंबात तिची अवहेलना झाली तरी ती 'स्व' चा अनुनय करण्यात धन्यता मानते.

**विशाखा कांबळे** यांच्या 'डिवोशन' कथेतील कुटुंब हे आदिवासी भागातील असून कुटुंबकर्ता पुरुष दुसऱ्याच्या शेतावर काम करतो. घरात पत्नी, दोन मुले व दोन मुली अशा कुटुंबाची गुजराण होत नाही. म्हणून तो कुटुंब घेऊन शहरात जातो. सायकल रिक्षा चालवतो. त्याची पत्नी घरकाम करते. सर्व मुले शाळेत जातात. अर्थातच कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शहरात जाऊन मुलांना शिकवून मोठे करणाऱ्या कुटुंबप्रमुख व त्याच्या संस्कारात वाढणारी मुले अशा कुटुंबाचे दर्शन या कथेत घडते.

'फिंगर प्रिन्ट' या कथेतील सुशांतच्या आईचे निधन होते. तो कॉलेजमध्ये बी.ए.करीत असताना त्याचे वडील मनोहर भोसले दुसरे लग्न करतात. त्यावरून दोघांत वाद होतात. त्याचा मोठा भाऊ पदवी घेऊन शेती सांभाळतो. वडिलांशी जुळवून घेतो. त्याचे लग्न होते. सुशांत शहरात राहून शिक्षण घेतो. तो पोलिस खात्यातील परीक्षा पास होतो.वडिलांनी तरुणीशी केलेले लग्न त्याला आवडले नसले तरी त्यामुळे कुटुंबात संघर्ष निर्माण झालेला नाही. एक सधन,सुशिक्षित व समजदार कुटुंब यातून साकार होताना दिसते. 'लिव्हिंग रिलेशनशीप' या कथेतील माधवी साळोखे पदव्युत्तर शिक्षणानंतर सहकार क्षेत्रात अधिकारी होते. मनोहर साठे या पत्रकारांशी तिची मैत्री होते. ती दोघे लग्न न करता एकत्रपणे आयुष्य घालवायचा निर्णय घेतात.तिला तिच्या कुटुंबाकडून विरोध होतो.

**मोहना कारखानीस** यांच्या 'जाईचा मांडव' संग्रहातील 'पिल्लू' कथेत सधन, सुखी व उद्योगी असे कुटुंब आहे.लग्नाला तीन वर्ष होऊनही मानिनीला मूलबाळ होत नाही, म्हणून तिच्या तपासण्या केल्या जातात.पण तिचा नवरा अमेयमध्ये दोष असतो. तिला पराधीनतेची जाणीव होते. मातृसुखापासून ती वंचित राहते. मात्र त्यावरून कुटुंबात काही ताणतणाव निर्माण होत नाही.सगळे काही व्यवस्थित चाललेले असते. तिचे व तिच्या दिराचे घरी एकांतात अचानक व प्रासंगिक असे संबंध जुळून येतात आणि ती त्यापासून गरोदर राहते. पती, सासू, सासरे यांना आनंद होतो. मात्र इथे कुटुंबातील कोणाही सदस्याच्या मनात शंकाकुशंका नसते.घरात आनंदीआनंद वातावरण असते,अशा सुखी व समाधानी कुटुंबाचे चित्रण या कथेत येते.

'दोन आज्यांची गोष्ट' कथेतील सुंदराबाई कुटुंबात सुखी जीवन अनुभवते. मुलगा, सून व नातू यांच्या सुखाने भरभरून पावलेली स्त्री तिच्या कुटुंबाविषयी समाधानी असल्याचे चित्रण लेखिकेने केले आहे. त्यातून सुशिक्षित,सुसंस्कारी , सुखी व समाधानी कुटुंब वाचकांच्या मनाला भुरळ घालते. 'पैंजण' संग्रहातील 'सामोरी' कथेतील मैत्रेयीचं दहावीचे वर्ष असल्याने तिची आई मंजुश्री तिच्या अभ्यासकडे खूप लक्ष देते.पण तिचे वडील तिच्या आईला मारतात, छळतात. त्यामुळे ती घाबरत असते. त्यामुळे तिचं अभ्यासात लक्ष लागत नाही.तिला वडिलांपेक्षा शाळेतील शिक्षक चांगले वाटतात. अर्थातच पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत कुटुंबकर्त्या पुरुषाच्या वाईट वागण्याने कुटुंबातील मुलांच्या मनात भीती निर्माण होते आणि पत्नी सोडून गेल्याने कुटुंब विस्कळीत होते. 'जन्मदाता' कथेतील बापू एका कंपनीतील मोठ्या पदावरून सेवानिवृत्त होतात. प्रामाणिक व हुशार अशी त्यांची चारचौघात ओळख असते. पत्नीच्या निधनाने प्रेमाची व आपलुकीची उणीव त्यांना भासते. मुलांकडून आपुलकीचे शब्द त्यांच्या कानी पडत नाहीत. विनय हा त्यांचा मुलगा नेहमी रागाने बोलत असतो. त्यांच्यावर चिडतो. शेवटी त्याचे वडील घर विकण्यासाठी सही करत नाही, म्हणून विनय स्मृतीभ्रंश झालेल्या बापाला शहरात सोडून देतो. मात्र त्याचे वडील पोलिसांना

सोबत घेऊन येतात.मुलाला त्यांच्या ताब्यात देतात. अशाप्रकारे पैसा व संपत्तीमुळे कुटुंबातील वडील व मुलगा यांच्यातील संघर्ष लेखिकेने टिपलेला आहे.

**सुनिता कावळे** यांच्या 'उसवलेलं आभाळ' संग्रहातील 'स्पर्श' कथेतील अस्मिताचे सासू-सासरे तिच्या आईवडीलांच्या गरिबीवरून तिला टोमणे मारतात. पण तिचा नवरा तिची बाजू कधी घेत नाही. ही सल तिच्या मनात असते. तो केवळ मोलकरीण म्हणून तिच्याकडे पाहतो. बायकोवर प्रेम करून तिच्या भावना समजून घेत नाही. रात्री तिच्या मनाचा विचार न करता त्याला केवळ तिचे शरीर दिसते. पहिल्या मुलीच्या वेळी गरोदर असतानाही तो तिला घरातील कामे करायला लावतो. तो पत्नीपेक्षा आईवडीलांच्या भावना राखतो, म्हणून ती त्याच्याशी भावनिक पातळीवर एकरूप होत नाही. 'आधारवड' कथेतील विधवेला नवऱ्याच्या जागेवर अनुकंपा म्हणून बँकेत नोकरी मिळते. मुलांचं शिक्षण व संगोपन व्यवस्थित करण्यासाठी स्वतः बीएस्सी, बीएड. असल्याने शिकवण्या सुरू करते, स्वावलंबी असल्याने कोणाकडे पैशाची किंवा अन्य मदतीची मागणी करण्याची तिला गरज नसते. मात्र तो तिच्या सासरच्या मंडळीला स्वतःचा पराभव वाटतो. नातेवाईक तिच्याकडे स्वार्थीपणाने पाहतात. नणंद नावे ठेवते. 'तिने एवढे उपदव्याप करण्यापेक्षा घर सांभाळावं. नवरा मेल्याचं तिला काही दुःख नाही', असे बोलते तर गोड बोलून दीर तिच्याकडील सोननाणं घेऊन जातो. पण ती कोणाशी वाद घालत नाही. स्वतःच्या धाडसीपणावर व क्षमतेवर विश्वास ठेवते.

**आशा बगे** यांच्या 'चंदन' कथेतील मुकुंदच्या विभागात एका कनिष्ठ सेवा झालेल्या प्राध्यापिकेला विभागप्रमुख म्हणून नियुक्त केले जाते. त्यावरून त्याचे वडील वकील साहेब मुकुंदच्या भित्रेपणावर रागावतात. मुलगा आणि वडील,सून आणि सासरे,तसेच पती आणि पत्नी अशा तीन जणांचे परस्परांचे वागणे या कथेत अलिप्तपणाचे आहे. मुकुंद व वकीलसाहेब या बापलेकात परस्परांचे वागणे, बोलणे जुळत नाही, मतभेद होतात. त्याची पत्नी ही कुठलीच भूमिका घेत नाही.फक्त तिच्या जबाबदाऱ्या पार पाडत असते.

'समुद्र' कथेतील राधा व निरंजन या दोघांच्या कुटुंबात स्नेह असतो. राधाची आई अनुकंपा म्हणून तिच्या वडिलांच्या जागी नोकरीला लागते. तिची आई कशातही अडकलेली तिला वाटत नाही. तसेच निरंजनचे वडीलही उच्च पदस्थ नोकरीवर असूनही कशात रूतलेले किंवा कुटुंबात अडकलेले तिला वाटत नाही, अशी ही आयुष्यात अलिप्तपणे जगणारी माणसे दोन्ही कुटुंबात ती पाहते. ते दोन्ही कुटुंबातील सदस्य त्यांच्या स्वभावाला मुरड घालत नाही,त्यामुळे काहीसे ताणतणाव निर्माण होताना दिसतात.

'श्राद्ध' कथेतील सुमनताई, नोकरी करणारा तिचा मुलगा सुधीर व सून संजीवनी शाळेत जाणारा नातू. दुसरा बाहेरगावी नोकरीला असलेला मुलगा, असे हे कुटुंब असून प्रत्येक सदस्य ज्याच्या त्याच्या कामात असतो. मुलांनी त्यांच्या वडिलांचे वर्ष श्राद्ध करावे ,ही तिची इच्छा असते,पण बाहेर गावी असलेला मुलगा वडिलांच्या वर्ष श्रद्धाला येत नाही. जयंत व संजीवनी यांच्यासोबत ती राहते. जयंतने तरी वडिलांचे श्राद्ध करावे,असे तिला वाटते. पण तोदेखील कार्यालयाच्या कामात व्यस्त असतो. मग ती नोकरी करणाऱ्या संजीवनीशी प्रेमळपणाने वागते. सासूच्या भावना राखते आणि 'आपल्या माणसांच्या भावना दुखावू नये'असे सांगून सुधीरला वर्षश्राद्ध करायला सांगते. अशाप्रकारे कुटुंबात काही ताण किंवा वादविवाद न होता सारे जण समजदारीने वागताना दिसतात.

'एक पावसाळी संध्याकाळ' कथेतील पती व पत्नी त्याच्या कामात व्यस्त राहून स्वतःच्या नोकरी,पद,पैसा व प्रतिष्ठेसाठी धडपडतात. मुलगाही तसाच असावा ,असे त्यांना वाटते, त्याला ते समजून घेत नाहीत. त्यामुळे त्याच्यात न्यूनगंड निर्माण होऊन त्याचा मानसिक समतोल बिघडतो.कौटुंबिक जबाबदारीचे भान नसल्याने निर्माण झालेल्या समस्येला ते जबाबदार ठरतात. 'वर्तमान' कथेतील अभिराम सिव्हील इंजिनियरची पदवी घेऊन नोकरीच्या मुलाखतीच्या रोज पत्राची वाट पाहून वैतागतो. रागराग करतो. या साऱ्यांचा अभिरामला राग येतो. अनेक गोष्टींकडे तो तिरस्काराने पाहतो. त्याती तृप्ती, आनंद, इच्छा कशात आहे, हे कोणी समजून घेत नाही. आईला मात्र त्याच्या मनाची घालमेल तेवढी कळते. अशाप्रकारे ह्या मध्यमवर्गीय कुटुंबात सामान्य नोकरीवर समाधान मानणारे वडील व भाऊ हे उच्च पदस्थ नोकरीचा विचार करीत नाहीत, म्हणून ते अभिरामला समजून घेऊ शकत नाही.

**मंडलेकर कुमुद** यांच्या 'जाग' संग्रहातील 'तवंग' कथेत सात मुलींच्या जन्मानंतर आठवा मुलगा होतो. मुलीपेक्षा मुलाची आवड व 'मुलगा हवा' ही परंपरागत मानसिकता असलेले हे कुटुंब मुलीकडे दुर्लक्ष करते. म्हणजेच परंपरागत मानसिकता राखणारे कुटुंब या कथेत साकार झालेले आहे. 'पाथ' कथेतील पारू ही सधन अशा एकत्र कुटुंबातील सून असून तिला जास्त कामं करावे लागतात. श्रीमंत कुटुंब असले तरी कुटुंबकर्त्या पुरुषाच्या कंजूषीमुळे सासुरवाशिण स्त्रीला होणारा त्रास लेखिकेने रेखाटलेला आहे. विवाहित स्त्रीला कुटुंबात 'चूल आणि मूल' यापेक्षा अधिक काही स्थान दिले जात नाही.नवराही तिच्याकडे त्याच दृष्टीने पाहतो,म्हणून तिचे म्हणणे तो ऐकून घेत नाही,असे हे परंपरागत मानसिकता असलेले कुटुंब या कथेत दिसते.

**'देहकिनारा'** संग्रहातील 'पडताळा' कथेत सासू ,सासरे, दीर-जाऊ, असे मोठे व एकत्र कुटुंब आहे. त्यात राधिका नावाच्या विवाहितेचे जगणे लेखिकेने सांगितले आहे. तिचा नवरादेखील रात्री उशीरा घरी येतो. वरतून तिला रागावतो. अर्थात पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत पतीच्या सेवेशी पत्नीने स्वतःला समर्पित करून घ्यायला हवे, अशा पद्धतीने तिचा नवरा तिच्याशी वागतो. कुटुंबातील सासूसासरे जेष्ठ सदस्य व त्याचे आईवडील म्हणून त्याला काही शिकवण देत नाहीत. 'याच देही' कथेतही पती, पत्नी, तीन मुलं, एक मुलगी, नोकरदार, असा मोठा परिवार आहे.तरीही आजारी माधवला स्वतःच्या असहाय्य दुबळेपणाची जाणीव होत राहते. मंगला ही त्याची पत्नी असून तिला त्याच्या आजारपणाचा वैताग आल्याने बडबड करीत राहते. तसेच मुलगी मीनलही

उलटून बोलते. तेव्हा त्याला अधिकच तुटलेपणाची जाणीव होते. कुटुंबातील सदस्य त्याला समजून घेत नाही. त्याच्या भावना राखत नाहीत. जो तो आपापल्या तालात राहतो.

'पाचर' कथेतील एकत्र कुटुंबातील शालू लग्नानंतर सासरी खूप काम करीत राहते. भांडखोर सासू तिला मोकळेपणाने राहू देत नाही. ती सासूरवास सहन करते. नवरा तटस्थ भूमिका घेतो. त्यामुळे तिला कौटुंबिक सुख व समाधान अनुभवता येत नाही,म्हणून अनेक प्रश्न पडतात. 'पडसाद' कथेतही एकत्र कुटुंबात दोन विवाहित भाऊ ,त्यांच्या बायका आणि आई, असे सदस्य आहेत. त्या कुटुंबावर आईचा प्रभाव असून ती लहान मुलगा अशोककडे शेती सांभाळायला देते आणि पैशाचे व्यवहार मोठ्या मुलाकडे ठेवते. अशोक शेतीबरोबर शिक्षकाची नोकरीही करतो. त्याची बायको प्रेमळपणे घरची माणसं सांभाळत घरकाम करत राहते.समजूतदार विवाहिता नवऱ्याला चांगली शिकवण देऊन प्रेमळपणाने कुटुंबाची जबाबदारी पेलत राहते.

'प्रत्यय' संग्रहातील 'बायपास' कथेतील नाना सरकारी नोकरीच्या कामात व्यस्त असल्याने बायको मुलांकडे दुर्लक्ष होते. इतरांशी नाना खूप मोकळेपणाने वागतो, घरातच ते का असं वागतात याचं कारण त्यांच्या पत्नीला समजत नाही. तो ऑफिसच्या दौऱ्यावर असताना हृदयविकाराचा झटका येतो. बायपास सर्जरी करायची असे डॉक्टर सांगतो, पण नानाकडे तेवढे पैसे नसतात. नानाच्या फंडातील पैसे काढून मुलगा प्रदीप दवाखान्यात पैसे जमा करून देतो. त्यात नानाचं बायपास सर्जरी होते. 'वासे घराचे' कथेतील रघुनाथ व सुधाताईचा मुलगा राम बारावी नापास होतो. रात्री उशिरा घरी येतो. रघुनाथ रागवतो. मुलागाही उलट उत्तरे देतो. सुधाताई रामला जेवायला सांगते, तर रघुनाथ घराबाहेर जायला सांगतो. रघुनाथ सुधाताईलाच दोष देत राहतो. मुलांना वळण लावलं नाही. मुलं आईसारखी निर्बुद्ध निघाली, अशी बिर्भत्सना करतो. यामुळे कुटुंबात होणारे ताणतणाव यातून प्रकट झालेले आहेत.

**मोहना मार्डीकर** यांच्या 'तिचं आकाश' संग्रहातील 'घरटं' कथेतील सुलोचनाला वाढत्या वयानुसार शारीरिक व मानसिक थकवा येतो. ती तिचा पती श्रीनिवासला सांगते, पण तो तिला समजून घेत नाही. तिलाच बोलत राहतो. त्याच्या तोंडून बोलण्याने ती दुखावली जाते. थकवा आला की ती पडून राहते. दर महिन्याला आठआठ दिवस तिला पडून रहावं लागते. अशक्तपणा येतच राहतो. त्याची कारणे ती श्रीनिवासला समजावून सांगते, पण त्याच्यातील कुटुंबप्रमुख म्हणून आपल्या जोडीदाराचे दुखणे समजून घेत नाही. शेवटी त्याच्यातील पुरुषच तिला जाणवतो. त्याला सगळं कळते तरी तिचे महत्त्व त्याला वाटत नाही. पतीपत्नी आणि मुले अशा लहानशा कुटुंबात आपल्या जोडीदाराकडून मानसिक व भावनिक आधाराची अपेक्षा करणाऱ्या वयस्क विवाहित स्त्रीचा मनोभंग होतो.

'बदल' कथेतील सुमित्रा आणि अनंत यांना ऋषिकेश हा एक मुलगा आहे. तो आय.टी. क्षेत्रात शिकून अमेरिकेत जातो. धाकटी अश्विनी लग्न होऊन सासरी आनंदात अ सते. मुलांच्या जबाबदारीतून मोकळं झाल्याचं पन्नाशीच्या अनंतला बरे वाटते आणि पंचेचाळीस वर्षाच्या सुमित्राला मेनापॉज आल्याने ती सुस्त व अस्वस्थ राहते. सासूबाई तिला समजून घेतात व तिच्याऐवजी स्वतः देवपूजा करतात. दोघांमधील नातं मैत्रिणीसारखं असतं. अनंता व तिचे संबंधही प्रेमाचे व जवळीकतेचे असतात. ते पूर्णपणे एकरूप झालेले असतात, तरीही दोघांमध्ये अंतर पडत चालल्याची भावना तिच्या मनात निर्माण होते.'कशी करू स्वागत!'कथेतील नायिकेचे लग्न मिलिंद नावाच्या अधिकाऱ्याशी होते. शिवाय तिचा सासराही उच्च पदस्थ नोकरीला असतो. घरी शेती वगैरे सारी सुबता असल्याने पदवीधर झालेल्या या विवाहित तरूणीला माहेरची माणसं फार भाग्यवान समजतात, परंतु गृहिणी म्हणून सासरच्या कुटुंबात तिला सेवा व गुलामी याशिवाय दुसरे काही वाट्याला येत नाही. तेव्हा पितृसत्ताक कुटुंबातील स्त्रीचे दुय्यमस्थान यातून प्रकट होते.

**सुमती वानखेडे** यांच्या 'जाणता अजाणता' संग्रहातील 'माझं काय चुकलं' कथेतील उर्वी आणि जयंत या पतीपत्नीचा नव्याने संसार सुरू झालेला असतांना चारित्र्याच्या संशयावरून त्यांच्यात ताणतणाव निर्माण होतात. पुरुष हा कुटुंबकर्ता म्हणून सहजीवनाची मानसिकता चांगली ठेवत नसल्याने सांसारिक जीवनात ताणतणाव निर्माण होतात.त्यामुळे त्याचे कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होते. मूल न होण्यावरून कुटुंबात निर्माण होणारा संघर्ष, कुटुंबकर्त्या समजदार पुरुषामुळे टळतो. म्हणजेच कुटुंबात पुरुषाची भूमिका महत्वाची असली तर सासू व सून यांच्यात निर्माण होणारे भांडण कमी होते आणि कुटुंबात सुखशांती नांदते, याची प्रचिती या कथेतून येते. 'खिडकी' कथेतील मधुरेचा नवरा कॉन्ट्रॅक्टर असून त्याच्या नेहमी पार्ट्या होत असतात. त्यात तो व्यसनाच्या आहारी जातो. पैसा अडका भरपूर असल्याने रोज अपरात्री दाऊ पिऊन येतो. त्याचे दारू ते पिणं तिला नकोस वाटते. ती त्याला बोलूही शकत नाही. बोललीच तर तो तिच्यावर रागवतो. कुटुंबप्रमुखाच्या व्यसनामुळे कौटुंबिक स्वास्थ बिघडते, असे या कथेत सांगितले आहे. 'का म्हणून?' या कथेतील गार्गीला मुलबाळ होत नसल्याने तिच्या अनेक वैद्यकीय तपासण्या केल्या जातात. शिवाय कर्मठ जुन्या विचारसरणीच्या सासूचे बोलणेही एकावे लागते. त्यामुळे तिला शारीरिक व मानसिक त्रास होतो. कुटुंबात तिला कोणीही समजून घेत नाही.त्यामुळे कुटुंबात भानगडी होतात,पण दोष तिच्या नवऱ्यात असला तर त्याला समजून घेतले जाते,असे स्त्री व पुरुष यांच्यात भेदभाव करणारे कुटुंब यातून साकार झालेले दिसते. 'त्या दोघी' कथेतील श्रीमंती आणि वैभव असलेल्या घराण्याला वंशाचा दिवा हवा, म्हणून एक सधन कुटुंबाकडून गरीब कुटुंबातील तरुणीची फसवणूक तर होतेच, परंतु त्याचा ताण सहन न झाल्याने तिच्या वडिलांचे हृदय विकाराने निधनही होते.

**अरूणा सबाने** यांच्या 'अखेरचा निरोप' या कथेतील वडिल, मुलगा व मुलगी यांच्यातील वादविवादामुळे कौटुंबिक ताणतणाव निर्माण होतात.वडिलांच्या बाहेरख्यालीपणामुळे आईचा छळ होत असल्याचे तो मुलगा लहानपणापासून पाहत आलेला असतो. मुल मोठे होऊन कॉलेजला जाऊ लागतात, तरी नानाच्या वागण्यात बदल होत नाही. तेव्हा तरूण मुले आईची

बाजू घेतात. आईसाठी वडिलांशी भांडतात.पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत पत्नी व आई म्हणून स्त्री अधिक जबाबदारीने संसार करतानाही दिसून येते. तर मुले आईच्या बाजूने राहून वाडिलांना रागवतात.

**सीमा साखरे** यांनी 'झोपाळा' कथेतून संयुक्त कुटुंबातील सदस्याना कुटुंबप्रमुखाने जमविलेल्या संपत्तीविषयी त्याच्या वारसांना लोभ वाटतो आणि ते एकमेकांकडे चांगल्या भावनेने पाहत नाहीत. परक्याच्या कुटुंबातून नवरी म्हणून आलेली स्त्री सासरच्या कुटुंबात वेगळी मानली जाते.तिचा द्वेषही केला जातो,त्यामुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो.'आईच्या बांगड्या' या कथेतील विधा नावाच्या विवाहित तरुणीला दोन मोठे भाऊ विजय आणि दिलीप, आई आणि वडिल आहेत. मोठा विजय व त्याची पत्नी मुंबईला बँकेत नोकरी करतात. दिलीप गावातच प्राध्यापक म्हणून नोकरी करतो. त्याची बायकोही प्राध्यापिका असते. विधा स्वतः डॉक्टर व तिचे पतीही डॉक्टर असतात, असे हे सुस्थिर मध्यमवर्गीय कुटुंब आहे. मुले आजारी आईकडे लक्ष द्यायला तयार नसतात. 'पुण्यवान' कथेतील रावसाहेब, त्याची पत्नी सौदामिनी, दोन मुलं व एक मुलगी हे कुटुंब शहरात एका बंगल्यात राहते. सौदामिनीच सारी जबाबदारी सांभाळते. रावसाहेबाला वेळ नसतो. पती-पत्नी आपल्या मर्यादा सांभाळून एकमेकांशी प्रेमळ संबंध ठेवतात. मुलगी निर्मला परदेशात शिकून डॉक्टर होते. तिचे लग्न सौदामिनीच्या एका नातेवाईकाशी होते. दोन्ही मुले पराग व शिरीष हे दोघेही लहानपणापासून लाडात वाढलेले असतात. आईवडीलांचा दोघांकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न असल्याने दोघांत मतभेद होतात.

'शह-काटशह' कथेतील हेमंतची आई एकेकाळी प्राध्यापक, श्रीमंताची मुलगी असते. प्राध्यापकी सोडून घर सांभाळते. वडील कर्तबगार वकील असूनही घरात तिचेच वर्चस्व असते. बाबा मवाळ भूमिका गेतात. बाकी सर्वांना प्रतिष्ठितपणाचा गर्व असतो. लिनाला मात्र त्यांचा अहंकार सहन होत नाही. तिच्या व्यक्तिमत्वाचा तिला अभिमान वाटतो. पती व सासरे सोडून सर्व तिचा अवमान करतात. ते दोघे चांगले पतीपत्नी म्हणून राहतात. बाकी शत्रू वाटतात. सासू-सुनेचे संबंध ताणले जातात. सासरा तिच्या सासूला समजावून सांगतो, पण ती काही एकत नाही. सासू घटस्फोटाची धमकी देते. 'तेव्हा तुम्ही काय मला घटस्फोट देता? मीच जाते' असं म्हणून घर सोडते. 'विकतचं श्राद्ध' या कथेत शारदा, तिचे पती विनायकराव, त्याचे दोन भाऊ, सेवानिवृत्त सासरे व संधीवाताने अंथरूणाला खिळून असलेली सासू, अशा एकत्र कुटुंबात ती राहते. तिचा पती तिच्या हौसमौज पूर्ण करतो. लग्नाच्या सहा महिन्यानंतरच विनायकरावचा अपघाती मृत्यू होतो व ती विधवा होते.सासरच्या कुटुंबात तिला काही स्थान उरत नाही. 'पळवाट' कथेतील प्रामाणिकपणामुळे मनोहरचा वकील व्यवसाय चालत नाही. त्याला वैफल्य येत. पत्नी मनोरमा सुंदर देखणी, बी.ए. झालेली, घर सांभाळणारी दहा-बारा वर्षाची दोन मुलं जय-विजय यांना आपण चांगलं आयुष्य देऊ शकत नाही, याची चिंता त्याला लागून राहते. तो आत्महत्येचाही प्रयत्न करतो. मानसिक संतुलन बिघडल्याचे नाटक करतो. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पेलण्यास असमर्थ असलेल्या कुटुंबप्रमुख पुरुषामुळे मुलांना लहान वयातच कामे करावी लागतात.

'सारा भ्रम' कथेतील कालिंदीचा नवरा तीला वकीली व्यवसाय करू देत नाही. दोन दीर, एक नणंद असं हे कुटुंब व घर सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर टाकल्याने ती घर सांभाळते. तिला घरात कोणी समजून घेत नाही. तिची सासू तिच्या सासऱ्याला बोलते, भांडते, पण सासरे शांत राहतात. तिला सासूची सहानुभूती वाटते. घर सांभाळतांना कालंदीला स्वतःविषयी विचार करण्याला वेळच मिळत नाही. सासरा स्वयंपाकवालीशी संबंध ठेवत असल्याने सासू धिंगाना घालते. माहेरी निघून जाते. पुन्हा परत येते.मुले मात्र तिलाच शांत राहायला सांगतात. वडिलांची बाजू घेतात. तिच्या सासऱ्याच्या मृत्यूनंतर तिची सासू त्याच्या ताणातून मुक्त होते,पण कालिंदीचा नवरा वडिलांच्या वळणावर जातो,तोही बाहेरख्यालिपणा करतो,तेव्हा कालिंदी भांडत नाही,तर स्वतः वकिलीचा व्यवसाय करण्यास सिद्ध होते, अशाप्रकारे कुटुंबातील पुरुषांच्या अनैतिक वागण्यामुळे कुटुंबात निर्माण होणारे भांडणे व ताण याचे चित्रण या कथेत येते.

**मनिषा साधू** यांच्या 'वाट शहराची' या कथेतील तरुणाला उच्च शिक्षण घेण्यासाठी अमरावतीला शिकायला जायचे असते,पण त्याचे वडील मतभेद निर्माण करतात. त्याची आई गप्प असते. तिला काही मते नसतात. बघ्याची भूमिका घेण्याशिवाय दुसरा काही इलाज नसतो. शिक्षणावरून कुटुंबामध्ये भांडण होत नाही,तर घरी देखरेख करण्यासाठी मुलगा जवळ असावा,असे वाडिलांना वाटते.पण कुटुंबप्रमुख म्हणून ते मुलाच्या शिक्षणाला महत्व देतात. कुटुंबाचा जिव्हाळाही त्याच्या लक्षात येतो. 'निरोप' कथेतील सुशिलास सासरी एकत्र कुटुंबात खूप काम करावी लागतात. तिला सासरचे लोक माहेरी पाठवत नाही. तिचे कोणी नातेवाईक तिच्याकडे आलेले सासरच्या मंडळींना आवडत नाही. तिचा नवरा तिला मारझोड करतो. तिची बालमैत्रिण तिला भेटायला येते तर तिच्याशी मोकळेपणानेही तिला बोलता येत नाही.अर्थात सासरच्या कुटुंबात विवाहित तरुणीला चांगले वागविले जात नाही. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत स्त्रीची दुर्दशा या ठिकाणी होताना दिसून येते.'गुंजनबाबाचा सल्ला' कथेतील काम न करणाऱ्या आळशी तरुणाला कुटुंबात काही स्थान नसते. त्याच्या वाईट वागण्यामुळे त्याला कुटुंबातून ठोकरले जाते.

## निष्कर्ष

[1] स्त्री आणि पुरुष यांच्या विवाहानंतर त्यांना जी मुलं होतात त्यातून प्राथमिक कुटुंब तयार होते.त्या कुटुंबाचा विस्तार झाला की एक संयुक्त कुटुंब तयार होते

[2] पुरुष हा कुटुंबप्रमुख असतो. त्याचा प्रभाव संपूर्ण कुटुंबावर असल्यामुळे त्याच्या निर्णयाच्या बाहेर कोणी जात नाही.

[3] कुटुंबात नवविवाहित स्त्रीला अनेकदा छळ व त्रास सहन करावा लागतो, याचे चित्र काही लेखिकांच्या कथांमधून आलेले आहे

[4] पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत सासू व नवरा यांची मनमानी चालत असल्याने पत्नी व सून म्हणून अनेक स्त्रियांना वाईट वागणूक दिलेली असते.

[5] काही लेखिकांच्या कथांमधील कुटुंबातील नवविवाहित तरुणी सासु किंवा नवऱ्याचा त्रास सहन न करता घराबाहेर पडताना दिसतात

[6] अय्यर सुप्रिया चांदणचुरा, काळीज, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २००५
[7] आशिरगडे माधुरी,आई शपथ आणि इतर कथा,पहिली आवृत्ती,नागपूर,आकांक्षा प्रकाशन
[8] कांबळे विशाखा संजय, फिंगर प्रिन्ट',प्रथमावृत्ती, कोल्हापूर, स्वच्छंद प्रकाशन, २०१३
[9] कारखानीस मोहना, जाईचा मांडव, प्रथमावृत्ती, नवघर, डिंपल पब्लिकेशन, २०१५
[10] कावळे सुनिता, उसवलेलं आभाळ, सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती, वर्धा, २००४
[11] बगे आशा, चंदन, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००७
[12] मंडलेकर कुमुद, जाग, प्रथमावृत्ती, नागपूर, सुशील प्रकाशन, २००२
[13] मंडलेकर कुमुद, देहकिनारा, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००४
[14] मंडलेकर कुमुद, पडसाद, पहिली आवृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००४
[15] मंडलेकर कुमुद, प्रत्यय, पहिली आवृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००३
[16] मार्डीकर मोहना, तिचं आकाश, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २०१५
[17] वानखेडे सुमती : जाणता अजाणता, मेधा राजहंस, उन्मेष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००५
[18] शेकापुरे स्नेहलता, वास्तव, प्रथमावृत्ती, नवी मुंबई, देवयानी प्रकाशन, २००८
[19] साखरे सीमा, चार भिंतीच्या आत, प्रथमावृत्ती, नागपूर, सीमा प्रकाशन, २००७
[20] साधू मनिषा, डेल्टा, प्रथमावृत्ती, पुणे, संवेदना प्रकाशन, २००८